आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक ०७ सप्टेंबर २०२५

<u>ठळक बातम्या</u>

1. मातंग समाजातील युवक युवतींनी आरक्षणाचा लाभ घेऊन शिक्षणाच्या मोठ्या प्रवाहात येत प्रगती करावी, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचं बुलडाण्यात आवाहन.

2. एकलव्य एकल विद्यालय शिक्षक-पर्यवेक्षक प्रशिक्षण वर्गाचा नागपूरात समारोप; केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची उपस्थिती.

3. अनंत चतुर्दशीच्या दिवशी लाडक्या गणरायाला भावपूर्ण निरोप/ राज्यात अनेक ठिकाणी आज दुपारपर्यंत विसर्जन मिरवणुका.

4. कृत्रिम वाळू निर्मिती व वापराबाबत शासनाचे संपूर्ण सहकार्य असून, गुणवत्तेशी तडजोड नसल्याचं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे कृत्रिम वाळू निर्मितीवर कार्यशाळेत प्रतिपादन.

<u>केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले</u>

मातंग समाजातील युवक युवतींनी अनुसूचित जाती जमातीच्या आरक्षणाचा लाभ घेऊन शिक्षणाच्या मोठ्या प्रवाहात येत प्रगती करावी असे आवाहन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले. ते बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथे लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी मंचावर केंद्रीय आरोग्य आयुष मंत्री प्रतापराव जाधव, उपस्थित होते. याप्रसंगी आठवले यांनी केंद्रीय सामाजिक मंत्रालयाच्या विदेश शिष्यवृत्ती बद्दल माहिती दिली

*ही स्कीम आहे, ओव्हरसिज् स्कॉलरशिप. प्रत्येक वर्षाला जवळजवळ १३०-४० विद्यार्थ्यांना फॉरेन मध्ये मी पाठवतो ज्यामध्ये मातंग समाजाच्या मुलाने सुद्धा अप्लिकेशन करण अत्यंत आवश्यक आहे. अमेरिकेमध्ये, इंग्लंडमध्ये, फ्रान्समध्ये, जर्मनीमध्ये, युक्रेनमध्ये, रशियामध्ये, ऑस्ट्रेलियामध्ये अनेक ठिकाणी मोठमोठ्या युनवर्सिटीज् आहेत.*

पुढे बोलतांना आठवले म्हणाले कि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न द्यावा अशी मागणी आपण स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेट घेऊन केली आहे. ही मागणी लवकर मान्य होईल, असा विश्वास आठवले यांनी व्यक्त केला. राज्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुती सरकारच्या कार्यकाळात मुंबईच्या इंदू मिलची जागा भारतरत्न

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ४५० फूट उंच पुतळया करिता दिली त्याचे काम सुरु आहे, त्यामुळे महायुती आणि केंद्रातील सरकार हे दलित आदिवासी, सह सर्व घटकांसाठी सदैव काम करणारे आहे असेही त्यांनी स्पष्ट केल.

<u>शिक्षक-पर्यवेक्षक प्रशिक्षण</u>

कै.लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेतर्फे दरवर्षी नागपुरात एकलव्य एकल विद्यालय शिक्षक-पर्यवेक्षक प्रशिक्षण आयोजित केले जातात. यावर्षी 4 ते 7 सप्टेंबर 2025 दरम्यान रेशीमबाग येथील महर्षी व्यास सभागृह इथे हे वर्ग आयोजित करण्यात आले. शिक्षक-पर्यवेक्षक प्रशिक्षण वर्गाचा आज ७ सप्टेंबर रविवार रोजी सायंकाळी समारोप होत असून या समारंभाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी तसेच, नोबल पारितोषिक विजेते, चिल्ड्रन्स फाउंडेशन नवी दिल्लीचे कैलाश सत्यार्थी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित आहेत. मानकर स्मृती संस्थेअंतर्गत 1 हजार 185 एकल विद्यालय गेल्या 19 वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात कार्यरत असून हे सर्व विद्यालय विदर्भ आणि महाराष्ट्राच्या नाशिक जिल्ह्यातील अत्यंत दुर्गम, आदिवासी आणि नक्षल प्रभावित क्षेत्रात विद्यार्थ्यांना शिकवण्याच्या आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाच्या उपक्रमात सहभागी आहेत. दरवर्षी, शैक्षणिक सत्राच्या प्रारंभी सर्व विद्यालयांच्या अध्यापक आणि पर्यवेक्षकांसाठी चार दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे संस्थेतर्फे नागपुरात आयोजन केले जाते.

<u>महसूलमंत्री बावनकुळे</u>

लोकशाहीत प्रत्येकाला न्यायालयात जाण्याचा अधिकार आहे. ओबीसी पदाधिकारी न्यायालयात जात असतील तर तो त्यांचा अधिकार आहे. मात्र, सरकारही न्यायालयात ठामपणे आपली बाजू मांडणार आहे, असे मत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले. नागपूरच्या नियोजन भवन येथे प्रसारमाध्यमांशी बावनकुळे बोलत होते. ओबीसी संघटनांना आंदोलनाचा अधिकार आहे, परंतु कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही. मराठा व ओबीसी आरक्षणासाठी उपसमिती कार्यरत असून तिच्या शिफारशींमुळे सामाजिक सलोखा अबाधित राहील. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनीही राजकीय बाऊ न करता उपसमितीकडे आपली बाजू मांडावी, असे आवाहन त्यांनी केले.

## <u>प्लॅटफॉर्म बंद</u>

नागपूर मंडळ, मध्य रेल्वे तर्फे नागपूर स्थानकाच्या पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत उन्नतीकरणाची कामे सुरू असून या कॉनकोर्स (Concourse) चे फाउंडेशन काम हाती घेण्यात येणार असल्यामुळे प्लॅटफॉर्म क्रमांक-5 उद्या 5 सप्टेबर पासून पढील महिन्याच्या 29. ऑक्टोबर असे एकूण 52 दिवस पूर्णपणे बंद राहणार आहे.प्लॅटफॉर्म क्रमांक-5 वरून सुटणाऱ्या एकूण 18 गाड्या इतर प्लॅटफॉर्मवर स्थानांतरित करण्यात येणार प्रवाशांनी प्लॅटफॉर्म बदल आणि गाडी संचालनाची अद्ययावत माहिती NTES ॲप आणि रेल्वे चौकशी पोर्टल (enquiry.indianrail.gov.in) द्वारे जाणून घेण्याच आवाहन मध्य रेल्वे, नागपुर विभागाद्वारे करण्यात आले आहे.

## <u>गणेश विसर्जन</u>

१० दिवस चाललेल्या गणेशोत्सवाची अनंतचतुर्दशीच्या दिवशी सांगता झाली. पुढच्या वर्षी लौकर या असं आश्वासक आवाहन करीत वाजत गाजत गणरायाला निरोप देण्यात आला. अनेक ठिकाणी काल सुरू झालेली विसर्जन मिरवणूक अद्याप सुरू आहे. मुंबईच्या गणेशविसर्जन सोहळ्याचं आकर्षण असलेल्या लालबागच्या राजाचं विसर्जन तराफ्यातल्या बिघाडामुळे बराच वेळ खोळंबलं होतं, ते काही वेळापूर्वी गिरगाव चौपाटीवर झालं. नागपूर महानगरपालिकेने शहरातील २१६ ठिकाणी तयार केलेल्या ४१९ कृत्रिम तलावांच्या विसर्जन कुंडांमध्ये अत्यंत शिस्तबद्ध व भक्तीपूर्ण वातावरणात श्रीगणेशाला निरोप देण्यात आला. पुण्यात मानाच्या पाचही गणपतींचं विसर्जन झालं, मात्र काही ठिकाणी आज दुपारपर्यंत विसर्जन मिरवणुका सुरु होत्या विसर्जन मिरवणुकीने यंदा मागील वर्षीचा २८ तासांचा रेकॉर्ड मोडला आहे. अनंत चतुर्दशीला सकाळी सुरू झालेली ही मिरवणूक तब्बल २९ तासांहून अधिक काळ लोटूनही अद्याप सुरूच आहे. गोंदीयातही शहराच्या श्री टॉकीज चौकातील श्रीटॉकीज चा राजा, गांधी प्रतिमा येथील गणेश तसेच इतर मानाच्या गणपतीची भव्य मिरवणूक काढण्यात आली आणि मध्यरात्री पर्यंत विसर्जन करण्यात आले.

## <u>दुर्घटना</u>

राज्यात सर्वत्र गणेश विसर्जनाचा उत्साह शिगेला पोहोचला असताना काही ठिकाणी दुर्घटनांमुळे उत्सवाला गालबोट लागलं. विसर्जनादरम्यान, राज्यात विविध ठिकाणी मिळून ११ जणांचा मृत्यू झाल्याचं समजतं. अमरावती जिल्ह्यात धामणगाव रेल्वे तालुक्यात वाघोली गावात विसर्जनाच्यावेळी एका २२ वर्षीय युवकाचा पाय घसरून तो नदीत वाहून गेला. वाशिममध्येही एक युवक अरुणावती नदीत वाहून गेल्याची घटना घडली आहे.

कार्यशाळा

नदीतील अमाप वाळू उपश्यावर मर्यादा याव्यात या दृष्टीने राज्य शासनाने कृत्रिम वाळू अर्थात एम सॅन्ड धोरण स्वीकारले आहे. या धोरणानुसार नागपूर जिल्ह्यात विविध ठिकाणी एम सँड युनिट स्थापन करण्यासाठी स्वामित्वधनाच्या रकमेत प्रति ब्रास 400 रुपयांची सवलत देण्यात येणार आहे. पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने जिल्ह्यातील अधिकाधिक क्रशर उद्योजकांनी नियमानुसार कृत्रिम वाळू (एम सँड) धोरणाचा लाभ घेऊन एम सँड प्रकल्प उभारावेत व गुणवत्तापूर्ण सॅन्ड निर्मिती करावी, असे आवाहन राज्याचे महसूल मंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केल आहे. सदर येथील जिल्हा नियोजन भवन येथे आज कृत्रिम वाळू निर्मितीवर आधारित कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर, जिल्हा खनिकर्म अधिकारी डॉ. अतुल दोड, यावेळी उपस्थित होते. शहरांचा विस्तार होत आहे. महानगरे वाढत आहेत. येत्या काळात नवीन नागपूरची निर्मिती करण्यात येणार आहे. यासाठीच्या बांधकामासाठी मोठ्या प्रमाणात वाळू लागणार आहे. विकसित नागपूर घडविण्यासाठी कृत्रिम वाळू निर्मिती महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. यावेळी उपस्थित क्रशर उद्योजकांनी पालकमंत्री बावनकुळे यांच्याशी संवाद साधला.

जर्मन भाषा कोर्स

बुलडाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजमध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाकडून जर्मन भाषा मूल्यवर्धित अभ्यासक्रमास मान्यता देण्यात आली असून, इन्ट्रोडक्शन टू दी जर्मन लँग्वेज भाग-1 व भाग-2 हा अभ्यासक्रम दोन सेमिस्टर मध्ये शिकवण्यात येणार आहे. या अभ्यासक्रमासाठी वीस विद्यार्थी संख्या एवढी मर्यादा असून कोणत्याही शाखेतून बारावी उत्तीर्ण असलेले विद्यार्थी पात्र आहेत. अधिक माहितीसाठी डॉ.महेश व्यवहारे किंवा महाविद्यालय प्रशासनाशी संपर्क साधावा, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

हवामान

नागपूरच्या प्रादेशिक हवामान खात्याने आज पूर्व विदर्भातील सर्वच जिल्ह्यात तसेच अमरावती आणि अकोला येथे तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह तसेच मेघगर्जेनेसह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता वर्तवली आहे.

******